वन विभागांर्तगत अधिकारी / कर्मचारी
यांना गणेवश भत्ता मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक : एफएसटी-०६/१७/प्र.क्र.३५५/फ-४

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक :- १६ फेब्रुवारी, २०१८

<u>वाचा :</u>- १) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३०.०६.२०१७.

२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१/पी/यो/नबाप्र/चाबाप्र/प्र.क्र.३०/१५८३/२०१७-१८, दि.१८.११.२०१७.

<u>प्रस्तावना</u> :-

मुंबई वन संहिता खंड एक परिच्छेद १३२ मधील तरतूदी व प्रचलित शासन निर्णयानुसार वन विभागातील क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांना शासन खर्चाने गणवेश पुरविला जातो. सद्य:स्थितीत महसूल व वन विभागाचा शासन निर्णय दिनांक ०१.०२.१९९५, दि.१९.०३.१९९५ व शासन परिपत्रक दिनांक २४.११.२०११ मध्ये ठरवून दिलेल्या उद्दष्टिानुसार गणवेश व त्यासंबधी इतर २१ बाबींचा पुरवठा करण्यात येत आहे.

वन विभागातील कर्मचारी व अधिकाऱ्यांचा उत्तम गणवेश हा त्यांची कर्तव्ये आणि जबाबदा-या कार्यक्षमतेने आणि परिणामकारकरीत्या पार पाडण्यास बळ देणारा आहे. वन, वन्यजीव, जैवविविधता, पर्यावरण, निसर्ग यांचे संरक्षण आणि संवर्धन विषयक कामे प्रभावीपणे पार पाडताना अधिकारी / कर्मचाऱ्यांचा उत्कृष्ट गणवेश समाजामध्ये मानाचे आणि आदराचे स्थान निर्माण करण्यास उपयुक्त ठरतो.

वन विभागांतर्गत अधिकारी / कर्मचारी यांना पुरविण्यात येणाऱ्या गणवेशाच्या किंमतीमध्ये व त्यासोबत पुरविण्यात येत असलेल्या बाबींच्या संख्येत वाढ झाली आहे. वन विभागातील क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी यांना बदलत्या काळानुसार वापराकरिता सोयीस्कर, निसर्गाशी व समारंभाशी समरुप राहणारा विशिष्ट रंगाचा गणवेश व त्यासोबत पुरविण्यात येणाऱ्या २१ बाबींसाठी सुधारीत दराने गणवेश भत्ता मंजूर केलेला आहे.

सन २०१७-१८ या वर्षामध्ये अर्थसंकल्पीत निधीच्या अनुषंगाने वनविकास करापासून मिळणाऱ्या जमा रक्कमामधून वित्त व्यवस्था केलेल्या योजना ४४०६०१७१ या अंतर्गत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र.२ येथील दि.०६.०६.२०१७ व दि.१८.११.२०११७ रोजीच्या पत्रान्वये रु.३३०.७२ लक्ष इतक्या रक्कमेचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला असून, सदर निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

वित्त विभागाच्या दि.३०.०६.२०१७ रोजीच्या परिपत्रकातील सूचनांनुसार सन २०१७-१८ या वर्षामध्ये वन विकास करामधून मिळणाऱ्या जमा रक्कमेमधून वित्त व्यवस्था केलेल्या योजना ४४०६०१७१ या योजनेतंर्गत योजनेकरीता अर्थसंकल्पीत असलेल्या निधीपैकी **रु.३३०.७२ लक्ष (१३ कार्यालयीन खर्च २६४.५७ लक्ष व २१ साहित्य पुरवठा ६६.१५ लक्ष)** इतका निधी वन विभागातील वनक्षेत्रपाल, वनपाल, वनरक्षक, वनक्षेत्र सर्व्हेक्षक व सर्व्हेक्षक या संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांना गणवेश व इतर बाबींकरीता, **<u>मागील वर्षी सदर योजनेकरीता वितरीत केलेल्या निधीच्या विनियोगाबाबतचे प्रमाणपत्र सादर केले जाईल या अटीच्या अधिन राहून</u>** वितरीत व खर्च करण्यास शासनाच्या वतीने मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सदर योजनेअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी विभागीय स्तरावर तसेच वनवृत्त स्तरावर एकाच बाबीवर दोनदा खर्च होणार नाही याची संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी. तसेच सदरहू निधी वितरीत करण्यापूर्वी निश्चित केलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना गणवेश भत्याचे वाटप करताना कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी.

सदर योजनेवरील होणारा खर्च हा सन २०१७-२०१८ करिता प्रधान शिर्ष ४४०६-वनीकरण व वन्यजीवन. १०२ सामाजिक व क्षेत्र वनिकरण. (०८) (०१) वनविकास करापासून मिळणा-या जमा रकमामधून वित्त व्यवस्था करण्यात आलेल्या योजना (४४०६ ०१७१) या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होणा-या अनुदानातून भागविण्यात यावा.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१६१६३४१७९०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kode

Digitally signed by Atul Ashok Kode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d366233b80405514f23a879132aeec, serialNumber=f0d5ee4c99cc9cbfa8761b3ddc7bd6650bad33302f33a35400ad5aad2291371a, cn=Atul Ashok Kode
Date: 2018.02.21 12:23:38 +05'30'

(अतुल कोदे)

सह सचिव,

महसूल व वन विभाग

प्रति :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

४) सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)

५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

६) सह सचिव / उप सचिव, वित्त विभाग (अर्थ-३) / (व्यय-१०), मंत्रालय, मुंबई-३२.

७) उप सचिव, नियोजन विभाग (१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.

८) ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

९) निवडनस्ती, फ-४ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

विवरणपत्र-अ

संवर्गनिहाय गणवेशावरील प्रस्तावित खर्च

सन २०१७-१८

पदनाम	मंजूर पदाची संख्या	ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना गणवेश पुरवठा करावयाचा आहे त्यांची संवर्गनिहाय कार्यरत संख्या	शासन परिपत्रक ३.११.२०१६ न्वये शासनाकडून मंजूर दर रुपये	कार्यरत पदासाठी लागणार अनुदान (रुपयात)	रुपये हजारात
वनक्षेत्रपाल	६५९	५५९	५१६७	२८८८३५३	२८८८
वनपाल	२५१७	१९३७	५१६७	१०००८४७९	१०००८
वनरक्षक	९०६०	३७८२	५१६७	१९५४१५९४	१९५४२
वनक्षेत्र सर्व्हेक्षक	४०	१९	५१६७	९८१७३	९८
सर्व्हेक्षक	१६२	१०४	५१६७	५३७३६८	५३७
			एकूण	३३०७३९६७	३३०७३
म्हणजेच रुपये ३३०७३ हजार					